# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## महिन्याच्या पहिल्या शुक्रवारचा पवित्र तास

## शुक्रवार ०७ फेब्रुवारी २०२५

**सुरूवातीचे गायन ः** भजतो तुला भक्तीने   पान क. २५४

**निवेदक ः** प्रिय बंधू भगिनींनो, वेदीवरील पवित्र साक्रामेंतामध्ये साक्षात प्रभू येशूख्रिस्त आपल्याशी सुसंवाद करण्यासाठी उपस्थित आहे. आपण आपल्या मनातील सर्व विचार बाजूला सारून तन्मयतेने समोर असलेल्या प्रभू येशूकडे एकाग्र दृष्टीने पाहू या आणि आजच्या पवित्र तासाच्या प्रार्थनेत "समेटातून शांती" ह्या विषयावर चिंतन करू या.

*शांतता - ३० सेकंद*

**वाचक ः** आदाम आणि एवा यानी केलेल्या मूळ पापामुळे देव आणि मानव ह्यामधील प्रेमाचे नाते खंडीत होऊन देव मानवामध्ये अविश्वासाची एक मोठी दरी निर्माण झाली होती. ही दरी नष्ट करण्यासाठी दयासागर प्रभू परमेश्वराने आपल्या एकुलत्या पुत्राला खंडणीच्या मोलाने अर्पण करून फार मोठा त्याग केला आणि त्याद्वारे पापी मानवाच्या मूळ पापाचा डाग त्याच्या प्रिय पुत्राच्या रक्ताने धुतला आणि मानवाला तारण प्राप्त झाले. हाच सर्वसमर्थ देव आणि मानव यामधील समेटाचा नवा करार होय.

ह्या कराराद्वारे देव आणि मानव ह्यांचे नाते पिता पुत्र असे होऊन देव आणि मानव यामध्ये सुसंवादाचा सेतु तयार झाला. त्याचे फलित म्हणून आज आपण सुसंवादाद्वारे प्रत्यक्ष ख्रिस्ताबरोबर वार्तालाप करीत आहोत त्याबद्दल देवाला धन्यवाद देऊ या.

*शांतता - ३० सेकंद.*

**दया याचना ः** माझ्या मागून गा

१. तुझ्या विरूद्ध पाप मी केले, हे प्रभूजी, हे प्रभूजी   दया करा, दया करा  (२)
२. पापे माझी कबुल मी करितो, हे ख्रिस्ता,   दया करा, दया करा  (२)

आपल्या पापांची कबुली आपण ख्रिस्तासमोर केलेली आहे. त्याबद्दल मनस्वी पश्चात्ताप करून दयासागर येशूख्रिस्ता जवळ पापापासून मुक्ती आणि समेटाद्वारे शांती मागू या.

**गायन ः**  मुक्ती देई येशू नाम .... वसुंधरे गा - गीत क. ११५

*शांतता - ३० सेकंद*

**वाचक** ः पापापासून मुक्ती आणि समेटापासून शांती देणारा 'देवाचा शब्द' आपण पवित्र शास्त्रामधून शांतपणे एकाग्रतेने ऐकू या.

**लुक १५ ः १ ते ७**

*शांतता - ३० सेकंद*

**चिंतन** ः येशू म्हणतो पश्चात्ताप करण्याची गरज नसलेल्या नव्याण्णव नीतिमानांपेक्षा पश्चात्ताप करणा-या एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल. म्हणजेच मनस्वी पश्चात्ताप करणा-या पापी माणसाला देव क्षमादान देतो आणि त्याचाशी समेट करतो. उधळया पुत्रानेही मनस्वी पश्चात्ताप केला आणि तो परत घरी येऊन बापाला म्हणाला, "मी स्वर्गाविरूद्ध आणि तुमच्या विरूद्ध पाप केले आहे. मला क्षमा करा आणि वागवून घ्या". त्याच्या पित्याने त्याला मोठया मनाने क्षमा करून त्याच्याशी समेट केला. त्याद्वारे त्यांच्या घरात शांती नांदली. आगामी उपवास काळात आपल्यालाही पश्चात्तापाची नामी संधी मिळणार आहे. आपण मनस्वी पश्चात्ताप करून समेटाद्वारे आपल्या कुटुंबात, शेजोळात आणि धर्मग्रामात शांतीचे वातावरण तयार करू या.

*शांतता - ३० सेकंद*

**गायन** ः अंतर माझे उघड तुला (१ ले कडवे)

**वाचक** ः प्रभूने आपल्यावर केलेल्या सर्व उपकाराबद्दल आपण त्याचे आभार मानू या.

**आपला प्रतिसाद** ः **हे ख्रिस्ता, आम्ही तुझे आभार मानतो.**

१. आम्हाला प्रायश्चित संस्काराची देणगी दिल्याबद्दल ....
२. उपवास काळात समेटाद्वारे परिवर्तनाची संधी दिल्याबद्दल ....
३. आमच्या अपराध्यांना क्षमा करण्याची सुबुद्धी दिल्याबद्दल ....
४. मोहासमयी आम्हास मोहात पडून न दिल्याबद्दल ....
५. दररोजची भाकर आम्हाला दिल्याबद्दल ....
६. आम्हाला समेटाचा मार्ग दाखविल्याबद्दल ....
७. पापांच्या खोल दरीतून आम्हाला काढल्याबद्दल ....
८. समेटातून आम्हाला सुखशांतीचा आनंद दिल्याबद्दल ....
९. आमच्या पापांचे ओझे तू घेतल्याबद्दल ....
१०. तुझ्याशी सुसंवादासाठी प्रार्थना हा राजमार्ग दिल्याबद्दल ....

*शांतता - ३० सेकंद*

गायन : प्रभूचे झाले बहु उपकार (२ रे कडवे फक्त) गीत क. १६३

## विनंत्या

वाचक : आता आपण आपल्या विनंत्या प्रभूचरणी मांडू या.

आपला प्रतिसाद : **हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. हे प्रभो, आम्ही आहोत त्या स्थितीमध्ये तू आमचा स्वीकार करावा म्हणून आम्ही प्रार्थना करतो.
२. हे प्रभो, तू आमच्याशी सुसंवादाने बोलावे म्हणून आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो.
३. आम्ही बहकून गेल्यावर तू आम्हाला शोधून परत तुझ्या कळपात आणावे म्हणून आम्ही प्रार्थना करतो.
४. हे प्रभो, तुला अनुसरण्याची संधी तू आम्हाला द्यावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो.
५. मनस्वी क्षमा करून परस्परांशी समेट करण्याची प्रेरणा आम्हाला मिळावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो.
६. दुस-याच्या डोळयातील कुसळ न पाहता स्वतःच्या डोळयातील मुसळ पहाण्याची दृष्टी आम्हाला मिळावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो.
७. वाईट व्यसने आणि अनैतिक कृत्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी इच्छाशक्तीचे दान आम्हाला मिळावे म्हणून आम्ही प्रार्थना करतो.
८. या उपवास काळात पश्चात्ताप, दानधर्म आणि प्रार्थना करण्याची प्रेरणा आम्हाला मिळावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो.
९. या उपवास काळात प्रायश्चित आणि समेटाद्वारे आमचे संपूर्ण परिवर्तन व्हावे म्हणून आम्ही प्रार्थना करतो.

*शांतता - ३० सेकंद*

## समारोप प्रार्थना

प्रभू येशूख्रिस्ता, तू म्हणतोस, ‘जो मला अनुसरतो तो अंधारात चालणार नाही तर त्याच्या जवळ जीवनाचा प्रकाश राहील’. (योहान ८ : १२). होय प्रभू येशू ख्रिस्ता, तुझे हे वचन अनुसरून आम्ही तुझ्यासमोर बसलो आहोत. तुझ्या मुखातून निघणारे तुझे पवित्र शब्द आमच्या ओठांना स्पर्शून आमच्या मुखातून हृदयाच्या खोल कप्प्यात वास करू देत. तुझ्या दिव्य शब्दांच्या अस्तित्वात प्रभू आमची वाढ कर. आम्हाला आमच्या दुःखात आम्हाला तुझे दुःख स्मरू दे. तुझ्या वात्सल्याचा परिमळ आमच्या जीवनात दरवळू दे आणि त्याद्वारे समेटातून आम्हाला शांतीचे वरदान दे. आमेन.

## साकामेंताचा आशीर्वाद

समारोप गीत : श्री येशू भगवान .... गीत क. ३०२